आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in



साप्ताहिक असो वा दैनिक असो आकर्षक छपाई योग्य दरात.

# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.:- MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ३९ वा ● मंगळवार दि. २९ जुलै २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## निवृत्ती वेतनधारकांनी आधारकार्ड व पॅनकार्ड संलग्र करण्याचे आवाहन

लातूर, (जिमाका): जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक व कुंटूंब निवृत्तीवेतनधारक यांनी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत जारी करण्यात आलेल्या परिपत्रक क्रमांक ०९/२०२५ नुसार आपले आधारकार्ड सोबत पॅनकार्ड दि. ३० सप्टेंबर, २०२५ पूर्वी संलग्न (लिंक) करावे.

विहीत मुदतीत आधारकार्ड व पॅनकार्ड संलग्र न केल्यास ऑक्टोबर २०२५ च्या निवृत्तीवेतनातून व कुंटूंब निवृत्तीवेतनातून आयकर कायद्यान्वये जास्तीचा आयकर कपात करण्यात येईल, असे जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्वला पाटील व अप्पर कोषागार अधिकारी के.एन. खोजे यांनी कळविले आहे.

## मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे काम गुणवत्तापूर्वक व दर्जेदार वेळेत पूर्ण करावे आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून कामाची पाहणी करून संबंधितांना दिल्या सूचना

लातूर – लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथे महायुती शासनाने मंजूर केलेल्या २५ कोटी ४७ लक्ष रुपये खर्चाच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाची लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी नुकतीच पाहणी करून सदरचे काम गुणवत्तापूर्वक आणि दर्जेदार वेळेत पूर्ण करावे अशा सूचना संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदारांना दिल्या.

लातूर तालुक्यातील मुरुड आणि मुरुड परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मागील काळात राज्यातील महायुती शासनाने उपजिल्हा रुग्णालयास श्रेणीवर्धन विशेष बाब म्हणून मान्यता दिली. सदर कामासाठी २५ कोटी ४७ लाख रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली.

मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे प्रत्यक्षात काम सुरू झाले असून या नियोजित दोन मजली ५० खटाच्या उपजिल्हा रुग्णालय इमारतीत तळमजल्यावर विविध आजाराचे स्वतंत्र तपासणी विभाग, प्रयोगशाळा, रक्तपेढी, अपघात विभाग, औषधालय, नाव नोंदणी, भांडार विभाग, प्रतीक्षालय, प्रशासकीय कार्यालय त्याचबरोबर पहिल्या मजल्यावर एकूण चार वार्ड, शस्त्रक्रिया कक्ष, डॉक्टर व आधिपरिचारिका यांचे कक्ष असून या इमारतीत उद्ववाहक (लिफ्ट) आणि जिना यासह सर्व सोयींनी युक्त असे सुसज्ञ बांधकाम करण्यात येणार आहे. या कामाची लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी नुकतीच पाहणी केली. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता एस. के. तांबोळी आणि ठेकेदार अभिषेक हलकुडे यांनी बांधकामाच्या कामाबाबतची सविस्तर माहिती दिली.

होत असलेले कामाबाबत समाधान व्यक्त करून सदरील बांधकाम गुणवत्तापूर्वक दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावे अशा सूचना देऊन या कामात कसल्याही प्रकारची तडजोड होता कामा नये असे यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले. यावेळी तहसीलदार सौदागर तांदळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आर. व्ही. गलांडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्र्वेता शेळके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता एस. के. तांबोळी, उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून टिळक कुटुंबियाचे सात्वन

पुणे, : लोकमान्य टिळक यांचे पणतू आणि केसरीचे विश्र्वस्त संपादक डॉ. दीपक टिळक यांचे १६ जुलै रोजी निधन झाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केसरीवाडा येथे टिळक कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी स्वर्गीय दीपक टिळक यांच्या प्रतिमेस त्यांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली.



यावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार विजय शिवतारे, स्वर्गीय दीपक टिळक यांचे पुत्र रोहित टिळक, स्नुषा प्रणति टिळक, मुलगी गीताली टिळक, नातू रौनक टिळक आदी उपस्थित होते.

श्री. शिंदे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले, लोकमान्य टिळक यांचे पणतू डॉ. दीपक टिळक यांचे दुःखद निधन झाले असून आपल्या सर्वांसाठी ही अतिशय दुः खद घटना आहे. डॉ. टिळक यांनी संपादक म्हणून काम पाहिले असून त्यांच्या निधनाने पत्रकारिता, साहित्य, मराठी संस्कृतीमध्ये पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या कुटुंबियाच्या दुःखात सहभागी आहोत. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी केसरी वृत्तपत्राच्या माध्यामातून दिलेल्या लढ्याचा वारसा टिळक परिवार पुढे नेत आहे, त्याचा आम्हाला अभिमान आहे, असेही श्री. शिंदे म्हणाले.

## पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करु

नागपूर, – प्राथमिक आरोग्य सुविधांच्या दृष्टीने प्रत्येक तीन किलोमीटरमध्ये आरोग्यसेवांचे जाळे निर्माण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या चार वर्षांत देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार आहे. यासाठी स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. येत्या काळात सिकलसेल, थॅलेसिमिया, निमियावरील महागड्या उपचारासाठी एक नवीन योजना तयार करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. लष्करीबाग येथील कमाल चौकात स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित स्व. भानुताई गडकरी मोमोरियल डायग्नोस्टिक सेंटरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी अध्यक्षस्थानी तर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि स्व. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेच्या अध्यक्ष कांचन ताई गडकरी यांची विशेष उपस्थिती होती.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आरोग्याच्या क्षेत्रात सेवेसोबतच संवेदनेलाही तेवढेच महत्त्व आहे. नितीनजीकडे सेवा आणि संवेदना या दोन्ही गोष्टी आहेत. त्यामुळेच आईच्या नावाने डायग्नोस्टिक सेंटर सुरू करून गरिबांची सेवा करण्याचा विचार त्यांनी केला आणि तो प्रत्यक्षातही उतरवला. हे केंद्र आरोग्य सेवेच्या क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, स्व. भानुताई गडकरी यांच्याकडून नितीनजींना समाजकार्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळेच ते देशात मोठ्या प्रमाणात काम करू शकत आहेत. समाजातील शेवटच्या व्यक्तीचे कल्याण हा नितीनजींच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. उपेक्षितांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ते सातत्याने काम करीत आहेत. उद्योग, कृषी, आरोग्य क्षेत्रात त्यांचे विशेष कार्य आहे. याच मालिकेत डायग्नोस्टिक सेंटरचा समावेश होतो. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात हे खूप मोठे पाऊल असल्याचे ते म्हणाले. एकीकडे वैद्यकीय क्षेत्रात विकसित तंत्रज्ञानाचा वापर वाढला असताना सेवांचे शुल्क देखील जास्त आहे. अशात एमआरआय आणि सिटी स्कॅनच्या मशीन्स भारतीय बनावटीच्या असतील तर सेवांचे शुल्क देखील कमी राहील. त्याचवेळी भविष्यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी हॉस्पिटल्सची संख्या वाढवावी लागणार आहे. आरोग्य क्षेत्रात काम करीत असताना सेवाभाव आणि संवेदना ह्या गोष्टी आवश्यक असतात. पुढील चार वर्षात देशातील सर्वोत्तम आरोग्य व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यात येणार असून सिकलसेल, थॅलेसिमिया, निमियावरील उपचारासाठी नवीन योजना तयार करणार असल्याचे ते म्हणाले.

## 'ई-लायब्ररी' चे सरन्यायाधीशांच्या हस्ते लोकार्पण: वकील आणि कायदेक्षेत्राला नवी दिशा

अमरावती, (जिमाका): अमरावती जिल्हा वकील संघातर्फे आज 'स्व. ड. टी. आर. गिल्डा स्मृती ई–लायब्ररी'चे अमरावती ल्हा व सत्र न्यायालय इमारतीत उद्घाटन सिपना इंजिनिअरींग कॉलेज, बडनेरा रोड येथे करण्यात आले. सरन्यायाधीश, न्या. भूषण गवई यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले.



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्या. अतुल चांदुरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या. आलोक आराधे, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती न्या. अनिल किलोर, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्या. नितीन सांबरे, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ तथा अमरावती जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती न्या. प्रविण पाटील, अमरावतीचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, ज्येष्ठ अधिवक्ता जुगलकिशोर गिल्डा आदी यावेळी उपस्थित होते. सरन्यायाधीश न्या. गवई म्हणाले, व्यावसायिक विस्तारीकरण झाले आहे. ई –हिअरिंग अशा विविध माध्यमातून नव तंत्रज्ञान आज न्यायदान क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावित आहे. आधुनिक काळात नवीन तंत्रज्ञानाचा वापर न्यायदान क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे .कायदेशीर अभ्यासाला आणि संशोधनाला गती देण्यासाठी उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक ई–लायब्ररीमुळे वकील तसेच कायदेविषयक अभ्यासकांना डिजिटल माध्यमातून अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे. या ई–लायब्ररीमुळे कायदेशीर संदर्भ, निर्णय आणि लेख त्वरित उपलब्ध होतील, ज्यामुळे वकिलांना खटल्यांची तयारी करणे अधिक सोयीचे होईल. ड. टी. आर. गिल्डा यांच्या स्मृतींना उजाळा देत, त्यांच्या नावाने सुरू झालेली ही ई–लायब्ररी कायदेशीर व्यवसायातील नव्या पायंडा रचेल, असा विश्र्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. न्यायदानाच्या प्रक्रियेत खूप बदल झाले आहे. इंटरनेट सुविधेमुळे कामकाजाचे स्वरूप बदलले आहे. यासाठी ई –लायबरी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ई–लायब्ररीचा आपल्या कार्यक्षेत्रात उपयोग करून घ्यावा. नवीन पिढीतील वकिलांना याचा निश्र्चित फायदा होईल. वकिलांनी रोज वाचन करणे आणि ज्ञान अद्ययावत ठेवणे गरजेचे असते. 'वाचाल तर वाचवाल' यानुसार अशीलाला मदत करण्यासाठी पारंपारिक वाचन पद्धतीसोबतच ई –लायबरी निश्र्चितच मदतनीस ठरेल,

## निम्न तेरणा प्रकल्पाच्या धरण क्षेत्रात पाणी पातळी, जलसाठ्यात येणारा येवा व पूर परिस्थिती आढावा उपविभागीय अधिकाऱ्या मार्फत..

औसा प्रतिनिधी : – निम्न तेरणा प्रकल्पाच्या धरण क्षेत्रात



सुरु असलेल्या पावसामुळे व प्रकल्प या अगोदर मे महिन्यात ७०%भरलेले असल्या कारणाने पाणी पातळी, जलसाठ्यासह इतर कामांची पाहणी लातूर जलसंपदा विभाग, निम्न तेरणा प्रकल्पाचे उपविभागीय अधिकारी तथा अभियंता नितीन बळवंतराव पाटील यांच्या मार्फत करण्यात आले आहे. संपूर्ण प्रकल्पाची पाहणी करण्यात आली, असून यासाठी शासनाच्या धोरणा नुसार संयुक्त रीत्या ज्या विभागाची यात सहभाग असणे गरजेचे आहेत असे यांत्रिकी व जलविद्युत विभागाची अधिकारी यांना प्रत्यक्ष भेट द्यावी व कामाची पाहणी करावी असे कळविले या पाहणीद्वारे प्रकल्पातील कामांचा कालबद्धता, आणि भविष्यातील अडचणी दूर करता येतील.

शासनाच्या या मोठ्या प्रकल्पास महत्त्वपूर्ण मानून त्यावर दक्षतेने लक्ष ठेवण्यासाठी वारंवार तपासणी आयोजन असावे हे धोरण,यात धरण क्षेत्रात पडणारा पाऊस व येणारा येवा लक्षात घेता, दि. २५ जुलै शुक्रवार रोजी उपविभागीय अधिकारी नितीन बी .पाटील यांनी निम्न तेरणा प्रकल्पाची पाहणी केली, व पूरस्थिती निर्माण झाल्यास काय उपाययोजना केल्या पाहिजेत याबाबत सखोल मार्गदर्शन केले. यावेळी पूर नियंत्रण कक्षातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. प्रकल्पाबाबतची पाहणीत व त्याचा उपयोग, तसेच भविष्यातील धोरणात्मक सुधारणा यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. योग्य पद्धतीने धरण सुरक्षेच्या दृष्टीने काम वेळेवर पूर्ण करण्याबाबत शाखा स्तरावर नियंत्रण ठेवणे बाबत कळविले आहे.

संपूर्ण प्रकल्पाची पाहणी करत जलसाठा, पाणी पातळी तपासली, येणारा नदी पात्रातून पाण्याचा येवा, रेडियल गेट बाबत पाहणी, डीजी सेट तपासणी, त्यास लागणारे इंधनाचे ईतर बाबत पाहणी, जलविद्युत कामाची माहिती घेत, महावितरण कंपनीला २४ तास विद्युत पुरवठा सुरू ठेवण्याचा संदेश देण्यात आला, प्रकल्पावर नागरिक ये – जा व गर्दी न होईल याची दक्षता घेत आवश्यकतेनुसार, पोलिस कर्मचाऱ्यांना सूचित करून, पूर नियंत्रण कक्षात २४ तास यंत्रणा कार्यान्वित ठेवण्या बाबत सांगण्यात आले. या प्रकल्पाचा स्थानिक तसेच प्रादेशिक विकासासाठी मोठा वाटा असल्याने, याची इतकी सविस्तर पाहणी आवश्यक असून

या सद्यस्थितीत प्रकल्पाची गुणवत्ता वृद्धिंगत होईल, तसेच भविष्यातील कामात अडचणी टाळता येतील. संबंधित अधिकाऱ्यांनी या पाहणीवेळी प्रकल्प कर्मचाऱ्यांशी संवाद साधला आणि प्राप्त माहितींचा अभ्यास करून उपाययोजना सुचविण्याविषयी चर्चा केली. संपूर्ण प्रकल्पाचे सखोल विश्र्लेषण आणि गुंतागुंतीचे मूल्यांकन यामुळे शासनाला पुढील धोरणे ठरविण्यास मदत होईल, ज्यामुळे या प्रकल्पाचा विस्तार आणि दुरुस्ती सुनिश्र्चित करता येईल असे यावेळी सुनिश्र्चीत करण्यात आले. यावेळी लातूर जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी तथा अभियंता नितीन बी.पाटील,शाखाधिकारी शुभम गंभीरे, मांडलेकर व पांडुरंग तांबे,पवार, सिंचन कर्मचारी कधीरे हे उपस्थित होते.

# नांदेडच्या एकाच अपिलार्थीचे ८१ अपील राज्य माहिती आयोगाने फेटाळले

लातूर, (विमाका) :– नांदेड येथील जनक रामराव गायकवाड या अपिलार्थीने राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल केलेले ८१ द्वितीय अपील आयोगाने फेटाळले आहेत. यासोबतच १९ अपिलार्थींनी दाखल केलेले ७ हजार ५६७ व्दितीय अपील आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळले आहेत.




अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील नमूद अपिलार्थी यांची द्वितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.

बहुतांश अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार अर्ज सादर करतात. अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी यांनी जेवढ्या ग्रामपंचायत कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केले त्या सर्व ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र जन माहिती अधिकारी पदनिर्देशित आहेत. मात्र अशा सर्व जन माहिती अधिकारी यांचेसाठी केवळ एकच प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित आहेत. बहुतांश वेळा अपिलार्थी जेवढे माहितीचे अर्ज दाखल करतात जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले दाखल करतात. या परिस्थितीत दैनदिन कामकाज सांभाळून अपिलाची यांच्या दाखल प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. मोठ्या संख्येने प्राप्त झालेल्या अर्जाचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावरुन होऊन सर्वसामान्य नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत या अपिलार्थी यांची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या www.sic.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत आहेत. त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये, प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे, त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्थान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

पुढील अपीलार्थीची आयोगाने द्वितीय सुनावनी घेवून अपीले फेटाळली आहेत. केशवराव निंबाळकर यांची आयोगाकडे दाखल २७८८ द्वितीय अपिले २६ जुन २०२४ तर ८४२ द्वितीय अपिले १९ डिसेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. शरद दाभाडे यांची १५९ द्वितीय अपिले २६ एप्रिल, २०२४ तर ९८५ द्वितीय अपिले २७ सप्टेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मोतीराम गयबु काळे यांची आयोगाकडे दाखल ४६३ द्वितीय अपिले २३ सप्टेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाळासाहेब भास्कर बनसोडे यांची आयोगाकडे दाखल २५६ द्वितीय अपिले २० डिसेंबर, २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. श्रीमती अनिता नितीन वानखेडे यांची आयोगाकडे दाखल ११६ द्वितीय अपिले ०६ सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बाबुराव धोंडु चव्हाण यांची आयोगाकडे दाखल १९८ द्वितीय अपिले २० जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. जयभीम नरसिंगराव सोनकांबळे यांची आयोगाकडे दाखल १७६ द्वितीय अपिले ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. हरि प्रताप गिरी यांची आयोगाकडे दाखल २९६ द्वितीय अपिले २८ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. विनोदकुमार भारुका यांची आयोगाकडे दाखल २३६ द्वितीय अपिले २८ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. गिरीश म. यादव यांची आयोगाकडे दाखल २०६ द्वितीय अपिले २३ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. संजय हाबु राठोड यांची आयोगाकडे दाखल १०० द्वितीय अपिले ३० ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. रायभान किसन उघडे यांची आयोगाकडे दाखल २१६ द्वितीय अपिले ३० सप्टेंबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. बालाजी बळीराम बंडे यांची आयोगाकडे दाखल १५६ द्वितीय अपिले ०१ ऑक्टोबर २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. भालचंद्र साळुंके यांची आयोगाकडे दाखल १०३ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. मिलिंद दगडु मकासरे यांची आयोगाकडे दाखल १२५ द्वितीय अपिले ३० ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. ज्ञानेश्र्वर धायगुडे यांची आयोगाकडे दाखल ८६ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत. सुरज नंदकिशोर व्यास यांची आयोगाकडे दाखल ६३ द्वितीय अपिले २४ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी घेऊन फेटाळली आहेत.

# मंत्री, अधिकाऱ्याना अभय ?

## संपादकीय...

सत्ताधारी नेते ही सत्ताबदल झाला की, त्या, त्या विभागातील अधिकारी बदलून मंत्रालयातील किवा जिल्हास्तरीतय नॉन एमपीएस अशा राज्यसेवेतील अधिकारी याना आपापल्या मर्जीनुसार मंत्रालयीन कार्यालयात घेत असतात. आयएस हे केंद्रीय सेवा संवर्ग आणी राज्यसेवेतील बिगर आयएएस अशा सेवाजेष्ठता, अनुभव या निकषातून त्याना तत्सम पदावर, पदोन्नतीवर बदली करण्यात येते पण तसे होताना दिसत नाहीत असे कारण देवून ठरावित अधिकाऱ्यांच्या फायद्यासाठी मुख्यसंविचवानी निकषात बदल केल्याने राजपत्रीत अधिकारी महासंघाने तिव्र नापसंती व्यक्त केल्याची कुजबूज मंत्रालय परिसरात होताना दिसते आहे.

महाराष्ट्रात महायूती सरकार कार्यरत असल्यापासून तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणी विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याना महाराष्ट्राला पारदर्शक, लोकन्यायीक, पारदर्शक कारभाराचे सरकार, प्रशासन देईल अशी ग्वाही दिली होती परंतू आजघडीला शासन, प्रशासनाची कार्यवाही, कारभारच उलट्या दिशेने निष्क्रियतेच्या मार्गाने चालतो आहे की काय अशी वास्तव प्रतिक्रिया राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे. ती नाकारुन चालणार नाही, कारण आमदार, आमदार समर्थकातील भांडणे, जेवणासाठी आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला आमदाराचीच मारहा,भ्रष्टाचारात गुंतलेले मंत्री, जूगारी मंत्री, शेतकऱ्याची चेष्ठा करणारे मंत्री, सरकारलाच भिकारी म्हणारे मंत्री विधानभवनात असतील तर महाराष्ट्राचा, महाराष्ट्राचा वैभवशाली पंरपरेला डागाळणारे सरकार कार्यरत असेल तर फडणवीस सरकार कसे भ्रष्टाचारमूक्त, पारदर्शक सरकार म्हणावे की मंत्री, अधिकाऱ्याना अभय देणारे सरकार म्हणावे हा सवाल आमजनता एकमेकाना विचारत असल्याचे दिसते आहे.

राज्यातील अनेक भ्रष्ट अधिकारी अनेक वर्षापासून एकाच ठिकाणी मोक्याच्या पदावरुन सेवा देत आहेत त्याना प्रशासन का व कशासाठी बदली करुन हाटवीत नाही, अशाना मंत्री कसे काय अभय देतात सेवोजेष्ठता, अनुभवाचा निकष डावलून दरवर्षी राज्यसेवेतील एपीएस संवर्गातील अधिकाऱ्याना उपसचिव म्हणून दर्जा दिला जातो पण मुख्यमंत्री कार्यालयातील एक, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयातील एक आणी सामान्य प्रशासन विभागातील एक असे तिन अधिकारी मागील सेवापरिसेन नापास झाले असताना त्याना कर्मीक गुण वाढवून त्यांचेच हित जपले गेले बाकीच्या पाच अधिकाऱ्याना संधी कशासाठी नाकारली जाते मंत्री व अधिकाऱ्याना अभय देवून पात्र अधिकारी डावलेले जातात, आणी अपात्र लोकाधिकारी बनून जनतेवर अन्यायाची कागदी नियमावली दाखून न्यायापासून वंचित ठेवतात यामूळे मंत्री महोदयाचे काय ते बघा परंतू आम्ही राज्यसवेतील कर्मचारी, मंत्रालयातील उपसचिव, सहसचिव दर्जाचे अधिकारी, कर्मचारी वरीष्ठ सचिव पदावरील अधिकाऱ्याचा अन्याय सहन करणार नाही त्यासाठी मॅट किंवा उच्च न्यायालयात दाद मागू असे निवेदन अव्वर सचिव व्ही राधा आणी मुख्यसचिवाना दिल्याने शासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्री व ठरावीक कअधिकाऱ्याना अभय का व कशासाठी देत असतील अशी कुजबूज मंत्रालय परिसरात होताना दिसते आहे.

एकूणच फडणवीस मंत्री मंडळात गुन्हेगारी प्रवृत्तीचे भ्रष्टाचाराचा आरोप असलेले अनेक मंत्री आणी अधिकारी हेच मोक्याच्या पदावर, खुर्चीत असल्यानेच हे अभयाचे वारे, वादळ जनतेला मतदारानाच उध्वस्त करीत असल्याची लोकभावना व्यक्त होते आहे ती वास्तव असावी.

## आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन

आजचा दिवस म्हणजे २९ जुलै हा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक स्तरावर वाघांचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे म्हणून सेंट पिटरर्सबर्ग येथे झालेल्या व्याघ्र परिषदेत २९ जुलै हा दिवस जागतिक व्याघ्र दिन म्हणून घोषित करण्यात यावा असा ठराव मांडण्यात आला त्याला सर्व देशांनी अनुमोदन दिल्याने हा दिवस जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन म्हणून साजरा केला जातो. वाघ हा जंगलाचा राजा आहे. जंगलातील त्याची निर्धास्त चाल गगनभेदी डरकाळी या त्याच्या गुण वैशिष्ट्यामुळे वाघ हा सर्वांना आकर्षित करणारा प्राणी आहे. जगभरात कोणत्याही अभयारण्यात, जंगलातील सफरीवर गेलेल्या पर्यटकांचे पहिले आकर्षण वाघ दिसण्याचे असते. भारतीय संस्कृतीत तर वाघाला आदरयुक्त भीतीचे स्थान आहे.

वाघाला जंगलाचा राजा असे संबोधले जाते. वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी असून जनमानसात शौर्य, राजबिंडेपणा, सौंदर्याचे, राकटतेचे प्रतीक आहे म्हणूनच हिंदू संस्कृतीत वाघ पार्वतीचा अवतार असलेली देवी महिषासुरमर्दिनीचे व तिच्या अनेक रूपांचे वाहन बनले आहे. वाघ आणि आदिवासी जमातींचा हजारो वर्षाचा संबंध आहे. आदिवासी जमातीत वाघाला देव मानतात. वाघांचा कोप होऊ नये म्हणून ते वाघाला देव मानून त्याची पूजा करतात. वाघांच्या अनेक जाती आहेत. भारतातील पट्टेरी वाघ जगातील वैशिष्ट्यपूर्ण प्राण्यांपैकी एक मानला जातो.

भारत हे वाघांचे माहेरघर मानले जाते. भारताप्रमाणेच आशिया व आफ्रिका खंडातील इतर देशातही वाघांचे अस्तित्व आढळते. पूर्वी वाघांची संख्या खूप होती परंतु मधल्या काळात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली. केवळ भारतातच नाही तर जगभरात वाघांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. खेळ, मनोरंजन आणि वाढत्या लोकसंख्येमुळे वाघांच्या आधीवासावर होणारे मानवी अतिक्रमण तसेच वाघांच्या अवयवांची तस्करी करण्यासाठी केली जाणारी शिकार यामुळे दिवसेंदिवस वाघांचे प्रमाण कमी होऊ लागले. वाघांचे प्रमाण इतके कमी झाले की एकेदिवशी वाघांची डरकाळी लुप्त होईल की काय अशी भीती निर्माण झाली. ही भीती अनाठायी नाही. कारण गेल्या काही वर्षात वाघांच्या शिकारीच्या अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत. चार वर्षांपूर्वी झालेल्या अवनी वाघिणीची शिकार कोण विसरेल? अवनी वाघिणीची शिकार झाल्यावर संपूर्ण देश हळहळला होता. अवनी प्रमाणेच गोव्यातही दोन वाघिणींची शिकार करण्यात आली होती. मागील चार वर्षात अनेक वाघांचे मृतदेह वनविभागाला आढळून आले आहेत. वाघ कमी होणे ही धोकादायक बाब आहे कारण जंगलात वाघ असणे हे समृद्ध जंगलाचे लक्षण समजले जाते. जंगलात असलेल्या अन्न साखळीत वाघ हा प्रमुख घटक समजला जातो. वाघांमुळे जंगलातील तृणभक्षी प्राणी व वनस्पती यांच्यात समतोल राखला जातो. वाघ नसतील तर जंगलात तृणभक्षी प्राण्यांची संख्या अमर्याद वाढेल व इतर निसर्गसंपदेवर या गोष्टीचा ताण पडेल परिणामी निसर्गचक्रच बिघडून जाईल. वाघ जंगलात असणे हे जंगलाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

वाघ असलेल्या जंगलात साधे लाकडूतोड करणारे व जंगलावर अवलंबून असणारव लोक भीतीपोटी जंगलात जात नाही त्यामुळे जंगलेही सुरक्षित राहतात. वाघ नाहीसे झाले की जंगलही नाहीसे होतील आणि जंगले नाहीसे झाल्यास निसर्गचक्रच बिघडून जाईल आणि त्याचे दुष्परिणाम केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावे लागतील. तसे होऊ द्यायचे नसेल तर वाघांचे अस्तित्व टिकवले पाहिजे. आज या आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने वाघांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करण्याची शपथ घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## 'ई-लायब्ररी' चे सरन्यायाधीशांच्या..

(पान १ वरुन) : असा विश्र्वास व्यक्त करून सरन्यायाधीश. न्या. गवई यांनी ई-लायब्ररीच्या गरजेवर आणि तिच्यामुळे कायदेक्षेत्रात होणाऱ्या सकारात्मक बदलांबाबत यावेळी समाधान व्यक्त केले. कारगिल दिनानिमित्त त्यांनी शहिदांचे स्मरण करून अभिवादन केले. ज्येष्ठ अधिवक्ता जुगलकिशोर गिल्डा यांनी इ लायब्ररीच्या स्थापनेसाठी देणगी दिली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. सुनील देशमुख यांनी केले. सूत्रसंचलन जिल्हा सरकारी वकील ड. परीक्षित गणोरकर आणि सहायक सरकारी वकील ड. सोनाली क्षीरसागर यांनी केले. आभार अमरावती जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ड. लांडे यांनी मानले. कार्यक्रमानंतर सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे अमरावती विमानतळ येथून प्रस्थान झाले. यावेळी आमदार रवी राणा, विभागीय आयुक्त श्र्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सौम्या शर्मा आदी उपस्थित होते.

## पर्यावरणाच्या रक्षणासाठी नागपंचमीच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण.

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साह दिसून येतो.श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिल्या जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते.नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो.नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे.याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे.या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो.

परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षीत वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी. पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात.अशीही आख्यायिका आहे की एक शेतकरी शेत नांगरणी करीत असतांना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर,वखर,कोणतेही खोदकाम करीत नाही. त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अवजारांचा वापर केला जात नाही.

भाज्या चिरायच्या नाही,तव्याचा वापर नाही,कांडन नाही,कापन नाही,असे काही नियम आजही पाळले जातात.नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुर्तीची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात.श्रावण माहिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज(सजावट) केल्या जाते.त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने पाळला जातो.श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची, शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वातावरण दिसून येते.श्रावण मासात विविध सण येतात त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात.

सांगली जिल्ह्याच्या पश्र्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे.सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे.पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा.तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील नाग मंडळेनाग पकडायच्या मोहिमेला निघत.यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची.

परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली.त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतीकात्मक मुर्तीची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळामध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूर्तीची मिरवणूक काढतात.आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे.त्यामुळे संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे.आजही भारतातील महाराष्ट्र,राजस्थान, गुजरात,केरळ, तामिळनाडू या प्रांतात नाग पूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते.

मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे.याठीकाणी नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे याठीकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात यात्रा असते.त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे.येथील अशी आख्यायिका आहे की भगवान शंकरजींचे तांडव सुरू असतांना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या.त्यामुळे या तिर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते. श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे.त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करतांना बेलफुल वापरण्यात येतो.भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी,वनस्पती, फुल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिलं जाते.त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणें अत्यंत गरजेचे आहे.

याकरीता श्रावण महिन्याचे व नागपंचमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील व जंगलातील प्राण्यांना जंगलात रहाण्याचा आनंद मिळेल.आज पृथ्वीला वाचवायचे असेल तर प्रत्येक सणांना मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे .कारण वृक्षाशीवाय सृष्टी अधुरी आहे.त्यामुळे सर्वांसाठीच वृक्ष अनिवार्य आहे.पृथ्वी साबुत रहाली तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित राहील अन्यथा विनाश अटळ आहे.कारण वृक्ष कटाईमुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे.त्यामुळे भुकंप, महाप्रलय, सुनामी,अती थंडी,अती उष्णता, ज्वालामुखी, दुष्काळ,भूस्खलन, समुद्राची पातळी वाढते अशा विविध धोकादायक घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असून भयावह रूप धारण होत आहे.याकरीता येणाऱ्या विनाशापासुन वाचण्यासाठी झाडे लावा जीव सृष्टी वाचवा हा मूलमंत्र सर्वांनीच अंगिकारला पाहिजे.नागव्दार स्वामी की जय!जय नाग देवता!हर हर महादेव!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## झरोका

एक - कॉंग्रेसच्या सत्ता काळात जातनिहाय जनगणना केली गेली नाही ही कॉंग्रेसची चूक नसून ती माझी स्वत: ची चूक असल्याची कबूली देवून ती चूक सुधारण्याची माझी पूर्वतयारी असल्याचे स्पष्ट केले हे विधान बालीश वाटते अचानक अशी उपरती, प्रायश्चित कसे काय झाले तेच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा - अरे, कॉंग्रेस रसातळाला पोंहचते आहे, तेलंगणा, कर्नाटक, आंध्रप्रदेशातून जातनिहाय जनगणनेसाठी उठाव होतोय. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी ही त्यांच्या पध्दतीने कंबर कसलीय, अन् हवा निघून गेल्यावर विरोधी पक्षनेते म्हणून ते त्या विषयाला आवळून धरु पाहात आहेत, त्यांचे काय ऐकतोस, शांत बस.

एक - अहो, मुळात कॉंग्रेस लोकशाही, धर्मनिरपेक्षवादी आहे, भाजपा मतलबी लोकशाहीतून हुकूमशाही कारभार करणारा पक्ष असल्याने राहूल गांधीच बरे वाटतात म्हणून बोलतोय.

दुसरा - अरे, गेल्यावीस वर्षापासून राहूल गांधी राजकारणात आहेत, शासन, प्रशासन, सत्ताकारण, विरोधी राजकारण आणी कोणत्याही विषयाची जाण, जाणीव, समस्या वगैरेची माहीती नसताना जून्या, अनुभवी कांग्रेसवाल्यांच्या मानगूटीवर बसून सोनिया गांधी, राहूल गांधी यानी सत्ताकारण केले, जूने शांत झाले कांही घरात कांही दुसरीकडे गेले आणी नवखे, कार्यशून्य लोक भोवती फिरु लागले म्हणून आज कोठेतरी, कोणा राज्यात विरोधीपक्ष म्हणून राहावे लागते आहे, त्यावेळीच शहाणपणा सूचला असता, मनाचा मोठेपणा देवून अनुभवीना साथ, सन्मान दिला असता तर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कॉंग्रेसमूक्त भारताची आरोळी देवू शकले नसते, गप्प बस्स.

एक - अहो, असं वैतागून बोलू नका, जातनिहाय जनगणना, दलित, अल्पसंख्याक, ओबीसी, मागासवर्गीयाच्या प्रश्न, समस्यासह अदिवासीचे प्रश्नाची जाण, जाणीव झाल्याचे राहूल गांधी यानी कबूल केले आहे. त्याना साथ द्यावी म्हणतोय.

## काय बोलता राव ?

स्थानीक स्वराज्य संस्था निवडणूकी संदर्भात भाजपा महायूती कॉंग्रेस महाविकास आघाडीने रणनिती आखली असून महाराष्ट्रातील महानगर पालीका,, नगरपालीका, नगर पंचायती, पंचायत समिती आणी कांही ग्रामपंचायतीच्या निवडणूका जाहिर झाल्याने भाजपा, शिंदेसेना आणी अजितदारांची राष्ट्रवादी कॉंग्रेस हे आणी इतर मित्र पक्ष मिळून भाजपा महायुती स्थानीक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका एकत्रीतपणे तर कूग्रेस, उध्दव सेना, ठाकरे सेना, शेकाप, भाकप, मापक मिळून एकत्रीत निवडणूक लढविणार असले तरी मुंबईत स्वबळाचा नारा भाजपा श्रेष्ठीनी दिला आहे.

### काय बोलता राव !

अरे, कालपरवा दोन दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीत होते, मंत्री, आमदारातील वाद आणी स्थानीक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यानी भाजपाध्यक्ष जे.पी. नड्डा, केंद्रीयमंत्री अमित शहा व अनेक मंत्री, नेत्यासोबत चर्चा केली परंतू श्रेष्ठीनी सारा निवडणूक तपशिल ऐकून भाजपा महायुती ही फक्त म्हणते फक्त मुंबई महानगरपालिका पूरती मर्यादीत असेल अन्य ठिकाणी भाजपा स्वबळावर लढेल असे स्पष्ट केल्याचे भाजपासूत्रातून बोलले जात आहे मग शिंदे, पवार यांचे काय, मग बोला दाजीबा !




## डिजिटल युगातला उपवास : संयम, शांती आणि सजगतेचा नवा मार्ग

उपास हा शब्द केवळ अन्नत्यागाशी मर्यादित नाही, तर त्याचा खरा अर्थ आहे - 'उप' म्हणजे जवळ, आणि 'वास' म्हणजे राहणं. म्हणजेच देवाच्या जवळ जाण्याचा, आपल्या आत्म्याच्या शुद्धीचा, आणि मनाच्या शांतीचा एक पवित्र मार्ग.

भारतीय संस्कृतीतील उपवास:

हिंदू धर्मात उपवास हा एक आध्यात्मिक शुद्धीचा मार्ग मानला जातो. श्रावण मास, एकादशी, चतुर्थी, महाशिवरात्र, चातुर्मास या काळात लोक आहारावर संयम ठेवतात, भजन-पूजन करतात, व्रत पाळतात आणि वाईट विचारांपासून दूर राहतात. उपासाने केवळ शरीर नव्हे तर मन, वाणी आणि वृत्तीही शुद्ध होतात. आजच्या ताणतणावाच्या जीवनात, ही परंपरा आपल्याला मानसिक आरोग्यासाठीही मार्गदर्शक ठरते.

इस्लाम धर्मात रमजान महिन्यात मुस्लीम बांधव उपवास (रोजा) पाळतात. सूर्योदयापूर्वी 'सेहरी' आणि सूर्यास्तानंतर 'इफ्तार' हा त्याचा क्रम असतो. रोजा म्हणजे केवळ उपाशी राहणे नव्हे, तर नजरेचा, वाणीचा, वर्तनाचा संयम. मन आणि शरीराचे शुद्धीकरण हे यामागचे प्रमुख उद्दिष्ट.

ख्रिश्र्चन धर्मात लेंट (ङशपीं) हा एक पवित्र काळ आहे, ज्यात ४० दिवस उपवास, प्रार्थना आणि पश्र्चात्ताप केला जातो. या काळात त्याग, सेवा, संयम आणि आध्यात्मिक चिंतन याला महत्त्व दिलं जातं.

जैन धर्मात उपवास हा आत्मशुद्धी आणि कर्मनिर्जरा (कर्मांचा नाश) करण्यासाठी केला जातो. पर्जुषण पर्व, संयम, एकासन, सल्लेखना ही काही त्याची उदाहरणं आहेत.

बौद्ध परंपरेत संयम, मौन, ध्यान आणि मध्यम मार्ग याला महत्त्व. काही विशिष्ट उपासना दिवसांवर साधू आणि उपासक आहारसंयम आणि मौन पाळतात.

आधुनिक काळातील गरज: 'डिजिटल उपवास'

आज मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया याने माणूस यंत्रवत आणि व्यस्त झाला आहे. शरीर जागेवर आहे, पण मन भटकतंय - स्क्रोल करतंय, तुलना करतंय, अस्वस्थ राहतंय. तंत्रज्ञानाचा अतिरेक - हेच आजच्या काळातलं 'मनाचं प्रदूषण' आहे. मोबाईलशिवाय आपण काही क्षणही शांत बसू शकत नाही. वेळ वाया जातो, नातं दूर जातं, आणि आपण स्वतः पासूनही दूर जातो. म्हणूनच, तंत्रज्ञानाचा ताळमेळ साधण्यासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी 'डिजिटल उपवास' ही काळाची गरज बनली आहे.

डिजिटल उपवास कसा करावा?

संपूर्ण दिवस नको, तरी आठवड्यातून काही तास खालीलप्रमाणे ठरवा:

मोबाईल विरहित वेळ: रोज १-२ तास ठरवून पूर्णत: मोबाईल बंद.

नेट विरहित रविवार: इंटरनेट बंद, घरच्यांसोबत गप्पा, मैत्र, वाचन.

टीव्ही/स्क्रीन टाईम कमी: मानसिक विश्रांती आणि संवाद वाढवा.

वाचन, ध्यान, लेखन, भजन: यासाठी वेळ राखीव ठेवा.

एकत्रित उपवास: धार्मिक व डिजिटल

पारंपरिक उपवासात जशी अन्नाची शुद्धता, तशी डिजिटल उपवासात विचारांची शुद्धता.

उपवासाच्या दिवशी सोशल मीडियापासून थोडं दूर राहा.

पोस्ट टाकण्याऐवजी आत्मचिंतन करा.

मोबाईल बाजूला ठेवा आणि स्वतःशी जोडा.

जग बदललंय, पण आत्मशुद्धीची गरज तीच आहे.

उपास म्हणजे अन्नाचा त्याग नव्हे, तर आपल्या अशुद्ध सवयींचा त्याग आहे.

आजचा माणूस तंत्रज्ञानाच्या महासागरात इतका गुरफटला आहे की त्याला स्वतःशी संवाद साधायलाही वेळ उरलेला नाही. अशा वेळी 'डिजिटल उपवास' ही केवळ एक कल्पना न राहता, मानसिक आरोग्य, नातेसंबंध आणि आत्मिक शांती यासाठी आवश्यक असा नवा जीवनशैलीचा भाग बनला पाहिजे. पारंपरिक उपवास जसा शरीरशुद्धीसाठी उपयुक्त आहे, तसाच डिजिटल उपवास हा मनशुद्धीसाठी आवश्यक आहे. थोडा वेळ मोबाईल, स्क्रीन आणि सोशल मीडियापासून दूर राहून आपण आत्मपरीक्षण, वाचन, ध्यान आणि निसर्गाच्या सान्निध्यात रमायला शिकलो, तर आपण अधिक सजग, शांत आणि समाधानी जीवन जगू शकतो. संयम, शांती आणि सजगतेकडे जाणारी ही वाटचाल म्हणजेच डिजिटल युगातला खरा उपवास आहे. पारंपरिक उपवासाची जागा डिजिटल संयम घेऊ शकतो. जेवढं आपण देवाजवळ जाण्यासाठी व्रत करतो, तेवढाच तंत्रज्ञानावर ताबा ठेवणं - हाच खरा भक्तीमार्ग आहे.

आत्मसंयमाने जीवन जगू या. पारंपरिक श्रद्धा आणि आधुनिक शिस्त यांची सांगड घालू या. डिजिटल उपवास म्हणजेच नव्या युगातील योग उपासना आहे!

**इंजि. सौ. शितल अ. सवासे**

## विषारी वृत्ती -- (नागपंचमी)

नागपंचमी सणासाठी
सिध्द चांडाळचौकडी
बिळात घुसू नागांच्या
संचारी पकडा पकडी

नागासह फोटोसेल्फी
कुवृत्तीआमची उघडी
नाग डे साजरा करी
बुध्दी जाहली नागडी

नागापेक्षा आमची ही
चाल वाकडी तिकडी
जिवंतनागांस छळतो
पुजितो मुर्त्या दगडी

मित्रम्हणवतो तयाला
विके सोलूनि कातडी
विदेशी चलन कमवी
भरितो तुडूंब पोतडी

डुख धरतो नाग राज
अंधश्रध्दा मनात वेडी
सुशिक्षितपुरोगामी मी
पायी आदिमानव बेडी

नागा पेक्षाही विषारी
माणूस आम्ही दुतोंडी
नाग पंचमी संपताचं
फिरेल जादूची कांडी

## वाजंत्री --

लग्न चालले शेजारी
आमच्याघरी वाजंत्री
इकडे पिटतो टाळ्या
तिकडे बनतात मंत्री

विश्र्वाचीपडली चिंता
घरात सडतात संत्री
चूल विझलेली घरा
वाढली समस्या जंत्री

चोरलुटारू परदेशांत
भुंकती गल्लीत कुत्री
पाऊस पडतो बाहेर
घरात वापरतो छत्री

प्रतिपक्ष जिंकणारचं
आम्हां अधीक खात्री
कुणाच पत्ता कापावा
गंजली जुनाट कात्री

दुश्मनाच्याशत्रूसोबत
जमलेली घनिष्ठ मैत्री
मिळेना सहअभिनेत्री
चाले नाटक एकपात्री

बोलता ठेवावा पोपट
रे कार्यक्रम एक सूत्री
वॉशींग मशीन तिकडे
डाग आमच्या चरित्री

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# रणरागिणी ताराराणी शौर्य, नेतृत्व आणि इतिहासाचा तेजस्वी ठसा

मराठी रंगभूमीला ऐतिहासिक नाटकांची सशक्त परंपरा लाभलेली लाभली आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आणि ताराराणी यांसारख्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांवर आधारित अनेक कलाकृतींनी या परंपरेला अनेकवेळा उजाळा दिला आहे. या परंपरेत युवराज पाटील लिखित व विजय राणे दिग्दर्शित रणरागिणी ताराराणी या नाटकाने आपल्या समर्पक लेखन, ताकदीचा अभिनय, आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर आपली वेगळी छाप पाडली आहे. हे नाटक केवळ एका ऐतिहासिक स्त्रीचे चरित्रनाटक नाही, तर ते एका इतिहासातील सशक्त स्त्रीपात्राची झुंज, धैर्य, नेतृत्व, आणि बुद्धिमत्तेची अजरामर कथा सांगते.



कथानक

रणरागिणी ताराराणी हे नाटक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पश्र्चात आणि छत्रपती संभाजीची राजांचे स्वराज्यासाठी बलिदान दिल्यानंतर निर्माण झालेल्या अस्थिर राजकीय परिस्थितीत राणीसाहेब ताराबाई यांनी घेतलेल्या राजकीय निर्णयांची आणि त्यामागील संघर्षांची गोष्ट सांगते. छत्रपती संभाजी महाराजांची औरंगजेबाकडून क्रूर हत्या, राजाराम महाराजांची कारकीर्द आणि नंतर ताराराणींनी स्वराज्याच्या रक्षणासाठी घेतलेली जबाबदारी हे या नाटकाचे केंद्रबिंदू आहे. महाराणी ताराराणी या एका राजमातेची मर्यादित भूमिका पार करून स्वतःच राज्यकारभार, सैनिकी धोरणं, किल्ले राखणं, आणि मराठ्यांचे मनोधैर्य उंचावणं हे सगळं करताना दाखवल्या गेलेल्या धैर्याची नाटकात सुरेख मांडणी केली आहे.

लेखनः युवराज पाटील

युवराज पाटील यांचे लेखन हे या नाटकाचा गाभा आहे. त्यांच्या लेखणीची तीन ठळक वैशिष्ट्ये लक्षात येतात (१) फक्त ऐकीव गोष्टींची मांडणी न करता, दस्तऐवजीकृत इतिहासाचा अभ्यास करुन प्रामाणिकपणे कथानक रचले आहे. यात ताराराणींच्या कारभाराची बारकाईने मांडणी असून एकही प्रसंग कल्पनेवर आधारित आहेत हे प्रेक्षकांना जाणवतही नाही. (२) प्रत्येक पात्राचे संवाद त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत आहेत. ताराराणींच्या संवादांमध्ये शौर्य आणि धोरणीपणा दिसून येतो. तर छत्रपती राजाराम महाराजांमध्ये द्विधा मनःस्थिती आणि मराठा सरदारांमध्ये कधी विश्र्वास, कधी शंकेची भावना जाणवते. (३) केवळ युद्धाचा किंवा राजकारणाचा विचार केला नाही, तर ताराराणीच्या एकमेव स्त्री म्हणून असलेल्या भावनिक संघर्षालाही स्थान दिलं आहे. यात त्यांचं मातृत्व, दुःख, मनातील गोंधळ, आणि न झुकण्याची जिद्द सखोलपणे जाणवते.

दिग्दर्शनः विजय राणे

विजय राणे यांचं दिग्दर्शन हे या नाटकाचं सर्वात मोठं यश आहे. हे नाटक केवळ ऐतिहासिक दृष्यांची मालिकाच नाही, तर एक सशक्त दृश्यशैली आणि अंतर्मुख करणारा अनुभव आहे. ताराराणींच्या जीवनातील संघर्ष, राजकीय चातुर्य, त्याग, आणि शौर्य यांना नाट्यमंचावर सादर करताना त्यांनी एक ऐतिहासिक दस्तऐवज जिवंत केला आहे. त्यांच्या दिग्दर्शनातून हे स्पष्ट होते की, त्यांना इतिहासाचा फक्त गौरव न करता, त्या काळातील राजकीय व सामाजिक गुंतागुंतीचं भान जपायचं आहे. विजय राणे यांची एक खासियत म्हणजे रंगमंचावरची दृश्यरचना. या नाटकात त्यांनी नेपथ्याचा आणि प्रकाशयोजनेचा पुरेपूर वापर केवळ सौंदर्यदृष्टीने केला नाही, तर प्रत्येक दृश्य आणि प्रकाशयोजनेला कथनाचा भाग बनवले.

अभिनय

ताराराणींची भूमिका साकारणाऱ्या मुख्य अभिनेत्री तनिषा वर्दे यांनी भूमिकेला केवळ न्याय दिला नाही तर ती जिवंत केली आहे. त्यांची संवादफेक, देहबोली आणि नेत्रसंचालन हे इतके प्रभावी आहे की तिच्या प्रवेशानेच रंगमंचावर ऊर्जा संचारते. ताराराणींचं धैर्य, समजूतदारपणा, कणखरपणा आणि सूक्ष्म भावनिकतेचं प्रत्ययकारी मिश्रण साकारलं आहे. त्यांची संवादफेक ठाम असूनही हळुवार, कठोर असूनही कोमलतेचा स्पर्श असलेली आहे. विशेषतः रणांगणातील युद्धप्रसंग, लढायातील तलवारबाजी आणि युद्धानंतरच्या सभा प्रसंगात, त्यांच्या चेहऱ्यावर असलेली ताणतणावाची छटा प्रेक्षकाला थक्क करून सोडते. अनुभवी रंगभूमी आणि चित्रपट अभिनेता सुनील गोडसे यांनी औरंगजेबाची भूमिका साकारली आहे. या भूमिकेत त्यांनी दिलेला अभिनय केवळ प्रभावी नव्हे, तर थेट काळजाला भिडणारा, अस्वस्थ करणारा आणि रंगमंचावर दडपण निर्माण करणारा आहे. गोडसे यांनी औरंगजेबाच्या भूमिकेसाठी स्वतःची देहबोली जाणीवपूर्वक बदललेली जाणवते. त्यांच्या चालण्यातला करडेपणा, डोळ्यांतील थंडपणा, आणि आवाजातला सत्ताधीशत्वाचा अहंकार, हे सगळं इतकं समर्पकपणे साकारले आहे की त्यांच्या प्रत्येक प्रवेशाला रंगमंचावर एक थरार निर्माण होतो. मुख्य चेहरे जसे प्रभावी ठरले, तसंच या नाटकातील सह कलाकारांचा अभिनय देखील नाटकाच्या यशात फार मोठं योगदान देणारा ठरतो. प्रत्येक सहकलाकाराने रंगमंचावर आपली जागा निर्माण केली आहे आणि त्यांच्या भूमिकांनी कथानकाला गती, गांभीर्य, भावनिकता आणि वास्तववाद प्राप्त करून दिला आहे. छत्रपती संभाजीराजे, येसूबाई, जानकीबाई, छत्रपती रामराजे यांच्या भूमिका अतिशय संयत, भावनिक आणि मर्मभेदी ठरल्या आहेत. तर सरदार, सेनापती, मावळे यांच्या भूमिकेतून त्या काळातील मराठ्यांची निष्ठा, जिद्द, आणि शौर्य प्रभावीपणे उभं राहिले आहे. त्यांच्या युद्ध प्रसंगांतील शारीरिक हालचाली, घोषणा, तलवारीबाजी, आणि चेहऱ्यावरील जोश प्रेक्षकांना इतिहासात घेऊन जातो.

थोडक्यात रणरागिणी ताराराणी हे नाटक केवळ ताराराणींच्या जीवनावर आधारित नाही, तर ते संपूर्ण स्वराज्याची, शौर्याची, आणि मातृत्वाच्या सन्मानाची साक्ष आहे.

युवराज पाटील यांच्या अभ्यासू लेखनाला विजय राणे यांच्या कल्पक दिग्दर्शनाची जोड मिळून ही कलाकृती रंगमंचावर अजरामर होते. श्रीमंत अभिनय, हृदयस्पर्शी संगीत, प्रभावी नेपथ्य, वेशभूषा, आणि आशययुक्त संवाद यामुळे हे नाटक आजच्या पिढीने आवर्जून पाहावे असे वाटते.

**- निखिल रवींद्र मालुसरे**
**संपर्क : ८८५०९०३४३५**

## इतिहासात आजचा दिवस २९ जुलै २०२५

अंतरराष्ट्रीय

१९२१ – अडॉल्फ हिटलर नॅशनल सोशियालिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीचा नेता बनला.

१९५७ – इंटरनॅशनल ॲटोमीक एनर्जी एजेंसी (आयएईए)ची स्थापना झाली.

१९८१ – प्रिन्स चॉर्लेस आणि लॅडी डायना स्पेन्सर यांचे लग्न झाले.

२००६ – पूर्व चीनमधील चांगसू प्रातांतील जर्मनीच्या मदतीने उभारलेल्या एका कारखान्यात झालेल्या स्फोटत २२ जण ठार झाले तर २८ जखमी झाले.

२००७ – रशियाची राजधानी मास्कोतून एका मालवाहू विमान आकाशात झेपावल्यानंतर काही वेळातच दुर्घटनाग्रस्त झाल्याने चालक दलाच्या ५ सदस्यांसमवेत ८ जण ठार झाले.

राष्ट्रीय

१९८७ – भारताचे पंतप्रधान राजीव गांधी आणि श्रीलंकाचे राष्ट्रपती जे.आर. जयवर्धने यांनी भारत–श्रीलंका मानववंश भूगोल मुद्याच्या करारावर स्वाक्षरी केली.

२००६ – मुंबई महानगरपालिकेने दक्षिण मुंबईच्या क्राफर्ड मार्केट भागातील मुनिम कंपाउंडमधील कुख्यात डॉन दाऊद इब्राहिमच्या कथित मालकीच्या सारा सहारा संकुला जवळील सात अवैध इमारती जमीनदोस्त केल्या.

२००७ – मेघालयच्या पश्चिम गारो या डोंगराळ जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे भूस्खलनात ८ जण ठार झाले.

२००८ – स्टार व्हॉइस ऑफ इंडियाचा २००७ चा विजेता इश्मित सिंगचा मालदिवमध्ये एका रिसॉर्टच्या स्वीमिंग पूलमध्ये बुडून मृत्यू झाला.

जन्म

१८८३ – बेनीटो मसुलिनी, इटलीचा आदेशक.

१९०४ – जी.आर.डी. टाटा, भारतीय उद्योगपती.

१९५९ – संजय दत्त, बॉलीवूड अभिनेता.

निधन

१०९९ – पॉप अर्बन दुसरा.

१६४४ – पॉप अर्बन पाचवा.

१९०० – अंबरटो पहिला, इटलीचा राजा.

२००७ – माईक रीड, इंग्रेजी विनोदी अभिनेता.

२००८ – मनोरमा बिर्ला, प्रख्यात उद्योगपती के.के. बिर्ला यांच्या पत्नीचे निधन.

# मँचेस्टरचा मुकाबला बरोबरीत

मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफोर्ड मैदानावर झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात भारतीय फलंदाजांनी दुसऱ्या डावात झुंजार खेळी करत मालिका जिंकण्याचे इंग्लंडचे मनसुबे उधळून लावले आहे. तब्बल दिडशे षटकांच्यावर गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण करून दमल्या भागलेल्या भारतीय संघाने बेन स्टोक्स न्ड कंपनीचा मारा बोथट करत सामना अनिर्णित राखला आहे. खरेतर हा भारतीय संघाचा नैतिक विजय आहे. कारण ३११ धावांची ऊधारी चुकवतांना भोपळा न फोडताही दोन मोहरे गमावल्यावर ज्या प्रकारे राहुल, गील, वॉशिंग्टन सुंदर यांनी खिंड लढवली ते नक्कीच कौतुकास्पद आहे.



झाले काय तर ही कसोटी मालिका अंतिम टप्प्यात आली असून इंग्लंड २/१ असा आघाडीवर आहे. वास्तविकत: भारतीय संघाने ३/० अशी बढत घ्यायला हवी होती. मात्र आपला संघ तुलनेत नवखा, थोडा अनुनुभवी असल्याने विजयाचा फायनल पंच आपण मारू शकलो नाही. मात्र पहिली कसोटी असो की लॉर्डसची, भारतीय संघाने पाचव्या दिवसापर्यंत झुंज दिली होती. थोडक्यात काय तर इंग्लंडला सहजासहजी विजय मिळवता आला नव्हता. अर्थातच शुभमन गिलचा संघ म्हणजे छोटा बच्चा समझके हमको ना समझाना रे हे इंग्लिश संघाला समजले असेलच.

राहिली बाब चौथ्या कसोटीची तर पहिल्या दिड दिवसात पीच गोलंदाजांच्या प्रेमात असल्याने भारतीय संघाची फलंदाजी बहरली नाही. जैस्वाल, राहुल, साई सुदर्शन आणि पंत ला चांगला स्टार्ट मिळूनही ते मोठी धावसंख्या उभारू शकले नाहीत. आयसीसीने पंत ला संघनिरपेक्ष खेळाडू म्हणून घोषित करायला हवे. कारण तो नक्की कोणत्या संघाकडून खेळतो, कोणत्या संघाला फायदा पोहोचवतो हे शेवटपर्यंत गुपित असते. ग्लॅमरस किंवा चित्रविचित्र फटकेबाजी करून तो स्वत:ला आणि आपल्या संघाला शारिरिक मानसिक इजा पोहोचवतो.

त्याचे बेधडक खेळणे कधी बेपर्वाई बेजबाबदारपणात परिवर्तित होते ते सांगता येत नाही. म्हणूनच आले पंतच्या मना तेथे कोणाचे चालेना असे म्हणावेसे वाटते. पंतची शारीरिक जखम भारतीय संघाच्या मनात खोलवर जखम करून गेली. तर लोअर ऑर्डर ३१४/६ ते ३५८/१० असा पुन्हा एकदा कोसळला. परत एकदा मोठी धावसंख्या उभारून इंग्लंडला कचाट्यात पकाडायची संधी आपण गमावली. त्यातच दुसऱ्या दिवशी इंग्लंड फलंदाजीला येताच पीचने रंग बदलला. अचानक पीच इको फ्रेंडली म्हणजेच बॅटर फ्रेंडली झाल्याने इंग्लंडचे चांगले फावले.

भारतीय गोलंदाजांच्या मर्यादा आणि खेळपट्टीचा सॉफ्ट कॅार्नर मिळताच इंग्लंड संघाने त्यावर ६६९ धावांचा प्रेमग्रंथ रचला. क्राऊली, डकेट, पोप पाठोपाठ रूट, स्टोक्सने दणदणीत दिडशतकी खेळी करत भारतीय गोलंदाजीची पिसे काढली. भरीस भर म्हणून त्यांच्या लोअर ऑर्डरने संघाचे हमदर्द बनत साथ दिली, जी आपल्या साठी सरदर्द ठरली. बुमराहची अंगदुखी आता भारतीय संघाची डोकेदुखी ठरली आहे. त्यातच सिराजची मेहनत प्रत्येक वेळी रंगत आणेलच असे नाही. तर ठाकूरचा शार्दूलविक्रिडीत समास अजूनही क्रिकेट रसिकांना अगम्य आहे. आम्ही कोण म्हणून काय पुसता आम्ही असू संघ लाडके या न्यायाने तो आजही संघात कायम आहे.

फिरकी बाबत बोलायचे झाले तर जडेजा, वॉशिंग्टनची जोडी इंग्लंडला वेसण घालू शकली नाही. लॉर्ड्सचा कटू अनुभव पाहता ३११ धावांची पोकळी कशी भरून काढणार ही चिंतेची बाब होती. त्यातच जैस्वाल, साई सुदर्शनने नमनाला घडीभर तेल ओतल्याने पुन्हा एकदा आपला शेअर बाजार गडगडण्याची दाट चिन्हे दिसत होती. मात्र कर्णधार गील आणि राहुलने मान खाली घालून फलंदाजी केली. या दोघांनी १८८ धावांची भक्कम भागीदारी रचत इंग्लंडला थोपवले. मात्र स्वराज्यावरचे संकट काही टळले नव्हते. हे दोघेही माघारी परतताच सगळी भिस्त जडेजा, सुंदर जोडीवर होती. कारण पंत जायबंदी झाल्याने त्याचे काही खरे नव्हते. तर शार्दूल सहीत लोअर ऑर्डर वरूण राजाकडे आस लावून बसले होते.

अखेर या डाव्याखुर्या दुक्कलीने सर्वस्व पणाला लावत बाजी मारली. दोघांनीही दमदार शतक झळकावून इंग्लंडचा हिरमोड केला. लढत भलेही बरोबरीत सुटली तरीदेखील आपल्या संघाची त्यांनी अब्रू राखली. अन्यथा मालिकेतील अंतिम सामना केवळ औपचारिकता राहिला असता. मात्र हा सामना बरोबरीत सुटताच भारतीय संघाला शेवटचा सामना जिंकून मालिका बरोबरीत आणण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तर दुसरीकडे इंग्लंडला मालिका जिंकण्यासाठी शेवटच्या कसोटीत भारतीय संघाचा पायबंद करावा लागेल.

हा सामना अनिर्णित राखण्यात इंग्लंड संघाचा अप्रत्यक्ष हात दिसून येतो. ज्याप्रकारे त्यांनी चौथ्या आणि पाचव्या दिवशी झेल सोडले ते पाहता क्षेत्ररक्षणाचे महत्व अधोरेखित होते. गील, जडेजाचे झेल सोडून त्यांनी स्वत:च्या पायावर कुर्हाड मारून घेतली. तर आतापर्यंत मालिकेत सर्वाधिक त्रासदायक ठरलेल्या बेन स्टोक्सचे जखमी होणे भारतीय संघाच्या पथ्यावर पडले. निसर्ग सुद्धा भारतीय संघासाठी तारणहार ठरला. एकतर पीच स्लिपींग ब्युटी, त्यातच कधी पावसाचे शिडकावे तर कधी अपुरा प्रकाश मदतीला आला. सामना अनिर्णित अवस्थेकडे मार्गक्रमण करत असताना कहाणीत एक ट्वीस्ट बाकी होते, खरेतर ते मानसिक द्वंद्व होते आणि याची सुरुवात केली ती इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने.

जडेजा ८९ तर सुंदर ८० धावांवर नाबाद असतांना बेन स्टोक्सने जडेजाला सिझफायरचा पर्याय दिला. मात्र हातातोंडाशी आलेल्या शतकांना आपले दोन्ही फलंदाज कसेकाय नाकारणार? स्टोक्सच्या पुकारता चला हूं मै ला जडेजा सुंदर जोडीने ना ना ना ना ना रे करत प्रत्युत्तर दिले. दोघांनीही इंग्लंडची तब्येतीत जीरवत आपापले शतक साजरे केले. या मानसिक धक्क्याने इंग्लंड संघ चिडला. त्यांना जेंटलमेन्सच्या गेम ची आठवण झाली. परंतु जखमी पंतला घातक गोलंदाजी करतांना त्यांना स्फुरण चढले होते. अखेर व्हायचे तेच झाले, भारतीय संघाने मानसिक दबाव टाकत अनिर्णित सामन्यात नैतिक विजय मिळवला.

थोडक्यात काय तर जडेजा, सुंदर लढले आणि त्यांनी इंग्लंडला रडवले. राहुल,गील,जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरने इंग्लंडच्या नाकावर टिच्चून फलंदाजी केली. सुंदरने गॅबा २०२१, अहमदाबाद २०२१, एमसीजी २०२४ आणि मँचेस्टर २०२५ ला संघ अडचणीत सापडला असताना उपयुक्त कामगिरी करत संघाला तारले आहे. तर सर जडेजा संघासाठी तन की शक्ती मन की शक्ती बोर्नव्हिटा आहे. गील राहुल जोडीने ७० षटके तर जडेजा सुंदर जोडीने जवळपास ५० षटके फलंदाजी करत सामना अनिर्णित राखला. तर इंग्लंड संघाकडे शेवटच्या दिवशी रफ जागेचा फायदा घेणारा स्पेशलीस्ट फिरकीपटू नव्हता, डॉसनची कामगिरी यथातथाच राहिली. सामन्याचा सर्वोत्तम खेळाडू म्हणून जरी बेन स्टोक्सची निवड झाली असली तरीही खरी महफील लुटली ती जडेजा सुंदर जोडीनेच.

**डॉ अनिल पावशेकर**
**दिनांक २८ जुलै २०२५**
**मो. ९८२२९३९२८७**

## शालेय विद्यार्थीनिसाठी लातूरच्या कोल्हे नगर भागात सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ,

लातूर प्रतिनिधी–विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या वतीने ट्वेंटीवन ॲग्रीच्या संचालिका सौ.अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थिनींना स्वतःचे संरक्षण स्वतःला करता यावे याकरिता दि.२७ जुलै २०२५ रविवार रोजी शहरातील प्रभाग क्र ५ मधील डॉ. जाकीर हुसेन कन्या हायस्कूल या ठिकाणी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण कार्यमाचा शुभारंभ करण्यात आला.

सेल्फ डिफेन्स कोर्सच्या माध्यमातून मुलींना आत्मसंरक्षणाचे विविधप्रकारचे धडे यामध्ये दिले जाणार आहेत.या कोर्सच्या माध्यमातून मुलींचेमनोधैर्य वाढवण्याचा प्रयत्न,त्याचबरोबर मुलींची शारिरक मजबुती,मानसिक शक्ती वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.या प्रशिक्षण केंद्राच्यामाध्यमातून कोल्हे नगर सह परिसरातील मुलींना निश्र्चित फायदा होणार आहे .

विलासराव देशमुख फाऊंडेशन च्या वतीने मागील काळात सर्व प्रशिक्षण केंद्रामधून ७२० मुली व ३७८ मुले असे एकूण १०९८ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

नुकत्याच शुभारंभ करण्यात आलेल्या शहरातील कोल्हे नगर भागातील मुलींच्या सेल्फ डिफेन्स व प्रशिक्षण केंद्र उद्घाटन प्रसंगी विलास को ऑप.बँक लातूर चेअरमन ड.किरण जाधव,विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक श्रीमती संगीता मोळवणे मॅडम,संस्थेचे सचिव श्री.कादरी के.एस, मुख्याध्यापक सिद्दीकी आर.आर,यांच्यासह शाळेतील शिक्षक,शिक्षिका,संस्थेचे सोशल प्लॅनर गजानन बोयणे तसेच प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# संच मान्यतेसाठी यावर्षीही ३० सप्टेंबर ची पटसंख्या ग्राह्य धरावी : लायक पटेल

लातूर : शासनाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ साठी दि. ३१ जुलै २०२५ ची पटसंख्या ग्राह्य धरण्यात येईल असे कळविण्यात आले होते. परंतु असे न करता दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दि. ३० सप्टेंबर चीच पटसंख्या ग्राह्य धरण्यात यावी, अशी आग्रही मागणी शिक्षा महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे राज्य चिटणीस लायक पटेल यांनी केली आहे.



राज्यामध्ये आतापर्यंत दरवर्षी ३० सप्टेंबरची पटसंख्या ग्राह्य धरून संचमान्यता करण्यात येत होती. परंतु शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ साठी दि. ३१ जुलैची पटसंख्या ग्राह्य धरण्यात येईल, असे शासनाच्या वतीने कळविण्यात आले होते. यामुळे राज्याच्या शैक्षणिक वर्तुळात एकच गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. कारण अजून सगळीकडेच इयत्ता पहिली ते बारावीचे प्रवेश सुरु आहेत. आधारकार्ड काढणे,जन्म नोंदणी दाखले वेळेत मिळत नाहीत. ग्रामीण भागात शेतकर्यांची कामे सुरु असल्याने प्रवेश कागद पत्र वेळेत मिळत नाहीत. शिक्षक बदली होत आहेत. त्यातच इयत्ता अकरावीचे यावर्षी पासून ऑनलाइन प्रवेश सुरू केल्यामुळे त्यात अनेक तांत्रिक दोष असल्यामुळे पन्नास टक्केही प्रवेश आजपर्यंत होऊ शकलेले नाहीत. त्यामुळे ३१ जुलैला सुद्धा राज्यात हजारो विद्यार्थी यू–डाइसच्या बाहेर राहणार असल्याकारणामुळे ही मुदत पूर्वीप्रमाणे ३० सप्टेंबर २०२५ करावी, अशा मागणी आपण एका निवेदनाद्वारे राज्याचे शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांच्याकडे केली केली आहे. तसेच फोनवर त्यांच्याशी याबाबत चर्चा करून या विषयाचे गांभीर्य ओळखून तातडीने निर्णय करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार लवकरच याबाबत अपेक्षित निर्णय होईल,असा विश्र्वासही लायक पटेल यांनी व्यक्त केला आहे.

## केवळ ३ दिवसात १००० हून अधिक मालमत्ता धारकानी घेतला सूट चा लाभ

लातूर/प्रतिनिधी : कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत वर्षाच्या सुरुवातीस नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी विविध सुट/सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कर `पश्रळपश भरणा–यास १० % व ऑफलाइन भरणाऱ्यास ५% सवलत देण्यात आली आहे . सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून शनिवार, रविवार सुटीच्या दिवशी सुद्धा १००० हून अधिक नागरिकांनी आपला टॅक्स भरून सुट चा लाभ घेतला . मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांच्या नियोजनानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सुट्टीच्या दिवशी सुद्धा कर संकलनाचे आदेश दिले होते. त्यानुसार सर्व क्षेत्रीय अधिकारी व टॅक्स विभागाचे कर्मचारी यांनी मेहनत घेऊन सुट्टीच्या दिवशी सुद्धा नागरिकांना टॅक्स भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.

## मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष : जनतेच्या आरोग्यासाठी समर्पित योजना गरजूंना दिलासा देणारे कार्य – अपर्णा यावलकर माहिती अधिकारी

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पना आणि मार्गदर्शनातून तसेच मंत्रालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या सक्रिय सहभागातून सुरु झालेला आहे. ही जनतेच्या आरोग्यासाठी समर्पित योजना असून यामार्फत गरजूंना दिलासा देणारे कार्य शीघ्रतेने सुरु आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठी या योजनेतून अर्थसहाय्य पुरविले जाते. राज्यातील तसेच देशातील आपत्तीग्रस्तांना तातडीने सहाय्य देणे, हे मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे उदिष्ट आहे. पूर, दुष्काळ, आगीमुळे होणारे अपघात अशा मोठया नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधी मार्फत अर्थसहाय्य पुरविले जाते.

अमरावती जिल्हयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे औपचारिक उद्घाटन १ मे २०२५ रोजी करण्यात आले असून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कक्ष कार्यरत आहे. १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीतील या कक्षामार्फत यशस्वीरित्या कार्य चालू आहे. यात एकूण लाभार्थी रुग्ण १७३ असून यांच्या उपचारासाठी एकूण १ कोटी ६९ लक्ष १५ हजार रुपये निधीचे वितरण करण्यात आले. या कालावधीत विविध गंभीर आजारांवर उपचारासाठी गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत आर्थिक मदत करण्यात आली. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षा अंतर्गत जिल्ह्यातील ६६ नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष योजनेतंर्गत कोक्लेअर इम्प्लांट, हार्ट, लिव्हर, किडनी, लंग, बोन मॅरो ट्रान्सप्लांट, हँड री–कन्स्ट्रक्शन, हिप,नी रिप्लेसमेंट, कॅन्सर सर्जरी, केमोथेरपी, रेडिओथेरपी, नवजात अर्भकांचे विकार, अपघात व विद्युत जळीत, डायलिसिस, हृदयरोग, लिगामेंट सर्जरी, बालकांच्या शस्त्रक्रिया इत्यादी आजारांचा समावेश आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, रुग्ण दाखल असल्याचा जिओ–टॅग फोटो, वैद्यकीय खर्चाचे प्रमाणित अंदाजपत्रक, उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न १ लाख ६० हजारापेक्षा कमी असणे आवश्यक) आधार व रेशन कार्ड, संबंधित निदान, उपचाराची कागदपत्रे, अपघात असल्यास एफआयआर, अवयव प्रत्यारोपण रुग्णांसाठी अधिकृत प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. ई–मेलद्वारे अर्ज सादर करण्यासाठी ररे.लीष–ाहऽर्सीं.ळप या मेल आयडीवर मेल करावे. अथवा रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक वरील ईमेलवर सर्व कागदपत्रांसह पीडीएफ स्वरूपात अर्ज सादर करू शकतात. आवश्यकतेनुसार संबंधितांनी कक्षाशी थेट संपर्क साधावा.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष योजनेत पुढील बाबींचा समावेश नाही. जसे राज्याबाहेरील रुग्णालयातील उपचार, योजनेच्या व्याप्तीतील नसलेले आजार, आधीच डिस्चार्ज झालेल्या किंवा उपचार पूर्ण झालेल्या रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत अर्थसहाय्य नाही. पूर्वी गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मंत्रालय, मुंबई येथे जावे लागत होते. आता मात्र जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष स्थापन झाल्याने, सर्व आवश्यक प्रक्रिया, मार्गदर्शन व मदत स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध झाली आहे. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम वाचून गरजूंना त्वरित मदत मिळविणे शक्य झाले असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे अध्यक्ष डॉ. श्याम सुरेश गावंडे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पना आणि मार्गदर्शनातून तसेच मंत्रालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या सक्रिय सहभागातून सुरु झालेला आहे. ही जनतेच्या आरोग्यासाठी समर्पित योजना असून यामार्फत गरजूंना दिलासा देणारे कार्य शीघ्रतेने सुरु आहे. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठी या योजनेतून अर्थसहाय्य पुरविले जाते. राज्यातील तसेच देशातील आपत्तीग्रस्तांना तातडीने सहाय्य देणे, हे मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे उदिष्ट आहे. पूर, दुष्काळ, आगीमुळे होणारे अपघात अशा मोठया नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित नागरिकांना मुख्यमंत्री सहायता निधी मार्फत अर्थसहाय्य पुरविले जाते.

अमरावती जिल्हयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे औपचारिक उद्घाटन १ मे २०२५ रोजी करण्यात आले असून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कक्ष कार्यरत आहे. १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीतील या कक्षामार्फत यशस्वीरित्या कार्य चालू आहे. यात एकूण लाभार्थी रुग्ण १७३ असून यांच्या उपचारासाठी एकूण १ कोटी ६९ लक्ष १५ हजार रुपये निधीचे वितरण करण्यात आले. या कालावधीत विविध गंभीर आजारांवर उपचारासाठी गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत आर्थिक मदत करण्यात आली. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षा अंतर्गत जिल्ह्यातील ६६ नोंदणीकृत रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष योजनेतंर्गत कोक्लेअर इम्प्लांट, हार्ट, लिव्हर, किडनी, लंग, बोन मॅरो ट्रान्सप्लांट, हँड री–कन्स्ट्रक्शन, हिप,नी रिप्लेसमेंट, कॅन्सर सर्जरी, केमोथेरपी, रेडिओथेरपी, नवजात अर्भकांचे विकार, अपघात व विद्युत जळीत, डायलिसिस, हृदयरोग, लिगामेंट सर्जरी, बालकांच्या शस्त्रक्रिया इत्यादी आजारांचा समावेश आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, रुग्ण दाखल असल्याचा जिओ–टॅग फोटो, वैद्यकीय खर्चाचे प्रमाणित अंदाजपत्रक, उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न १ लाख ६० हजारापेक्षा कमी असणे आवश्यक) आधार व रेशन कार्ड, संबंधित निदान, उपचाराची कागदपत्रे, अपघात असल्यास एफआयआर, अवयव प्रत्यारोपण रुग्णांसाठी अधिकृत प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. ई–मेलद्वारे अर्ज सादर करण्यासाठी ररे.लीष–ाहऽर्सीं.ळप या मेल आयडीवर मेल करावे. अथवा रुग्ण किंवा त्यांचे नातेवाईक वरील ईमेलवर सर्व कागदपत्रांसह पीडीएफ स्वरूपात अर्ज सादर करू शकतात. आवश्यकतेनुसार संबंधितांनी कक्षाशी थेट संपर्क साधावा.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष योजनेत पुढील बाबींचा समावेश नाही. जसे राज्याबाहेरील रुग्णालयातील उपचार, योजनेच्या व्याप्तीतील नसलेले आजार, आधीच डिस्चार्ज झालेल्या किंवा उपचार पूर्ण झालेल्या रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत अर्थसहाय्य नाही. पूर्वी गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मंत्रालय, मुंबई येथे जावे लागत होते. आता मात्र जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष स्थापन झाल्याने, सर्व आवश्यक प्रक्रिया, मार्गदर्शन व मदत स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध झाली आहे. यामुळे वेळ, पैसा आणि श्रम वाचून गरजूंना त्वरित मदत मिळविणे शक्य झाले असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे अध्यक्ष डॉ. श्याम सुरेश गावंडे यांनी सांगितले.

# भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा महमदापूर येथे बुधवारी जनता दरबार

लातूर – लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या ३० जुलै २०२५ बुधवार रोजी लातूर तालुक्यातील मौजे महमदापूर येथे जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. दर तीन महिन्याला लातूर ग्रामीण मतदार संघात चार ठिकाणी जनता दरबार घेण्यात येणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी घोषित केले असून लातूर तालुक्यातील मुरुड येथे नुकताच जनता दरबार घेण्यात आला या कार्यक्रमास जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला बऱ्याच जणांचे प्रश्न जागेवरच निकाली निघाले तर अनेक प्रश्नांना सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.



येत्या ३० जुलै २०२५ बुधवार रोजी लातूर तालुक्यातील मौजे महमदापूर येथे भातांगळी, बोरी, महापूर, महाराणा प्रताप नगर या पंचायत समिती गणातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील जनता दरबार ममदापूर पाटी येथील श्री हनुमान मंदिर सभागृह येथे सकाळी १० वाजता जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. तेव्हा ग्रामीण भागातील जनतेने आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जनता दरबार येथे आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बाबासाहेबांचे भव्य दिव्य स्मारक तळेगाव दाभाडे येथे उभे राहावे यासाठी सहकार्य करा.ॲड.रंजना भोसले.

देहू रोड येथे विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९५४ रोजी प्रथम बुद्ध रूप बसून धम्माचा प्रारंभ केला असे म्हणणे योग्य होईल,याच परिसरात म्हणजे तळेगाव दाभाडे येथे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ४१ एकर जागा खरेदी केली होती व त्या ठिकाणी बंगला बांधून काही काळ त्यांनी त्या ठिकाणी घालावला होता. परंतु त्यांचे विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही. सन १९६० रोजी बंगल्यास ४१ एकर जागा ॲडमिनीस्ट्रेटर जनरल मुंबई यांनी विक्री केली होती.बाबासाहेबांचे भव्य दिव्य स्मारक तळेगाव दाभाडे येथे उभे राहावे यासाठी सहकार्य करा.ॲड.रंजना भोसले अध्यक्ष विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती तळेगाव दाभाडे यांनी जाहीर आवाहन केले आहे.



विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तळेगाव दाभाडे येथील स्मारकासाठीची चर्चा करण्यासाठी स्मारक समितीचे अध्यक्ष ॲड.रंजना रघुनाथ भोसले यांच्या नेतृत्वाखाली व मान.यशवंत मानखेडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील प्रतिष्ठित नागरिक विविध क्षेत्रातील अधिकारी वर्ग सेवा नियुक्त अधिकारी तसेच विविध क्षेत्र कार्यात असलेले युनियनचे पदाधिकारी यांची एक बैठक रविवार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बहुजन हिताय बौद्ध विहार,माता रमाबाई चौक सिद्धार्थ नगर कल्याण पूर्व येथे आयोजित करण्यात आली होती. त्याला अनेक मान्यवरांनी उपस्थिती दाखवली.आम्ही विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तळेगाव दाभाडे स्थापना २००४ ला करून कोणत्याही प्रकारचे आंदोलन न करता केवळ प्रशासकीय स्तरावर आठ वर्षे संघर्ष करून सन २०१२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव केलेल्या बंगल्याला सर्वांसाठी खुले करून नगरपरिषद तळेगाव दाभाडे यांच्या ताब्यात दिला आहे.आज रोजी तो सर्वांसाठी खुला असून या बंगल्याला दररोज आंबेडकर अनुयायी देशभरातून भेट देत असतात. अशी ॲड. रंजना रघुनाथ भोसले यांनी माहिती दिली.

पुढे त्यांनी सांगितले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानांना बंगल्या शेजारी भूखंड क्रमांक २९ ते ३४ असून स्मारकासाठी आरक्षित करावे म्हणून आम्ही संस्थेच्या वतीने सन २००८ पासून तळेगाव दाभाडे महानगरपालिकडे सतत मागणी करीत आले आहे.तळेगाव दाभाडे नगर परिषदेने आमच्या मागणीनुसार दुसऱ्या नवीन सुधारित विकास योजनेच्या आखाड्यामध्ये वरील भूखंडावर आरक्षित करून महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवले होते परंतु महाराष्ट्र शासनाने कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता २०१३ रोजी रद्द केला आहे. तेव्हापासून आम्ही शासनाकडे भूखंड क्रमांक २९ ते ३४ हे आरक्षित करावे म्हणून पत्र व्यवहार करीत आहोत परंतु शासनाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही किंवा बाबासाहेबांचे भव्य दिव्य स्मारक तळेगाव दाभाडे येथे उभे राहावे असे वाटत नाही. शासन प्रशासन आम्हाला प्रतिसाद देत नाही.याबाबत तळेगाव दाभाडे नगरपरिषदेवर मोर्चा काढण्यात आला होता.परंतु खोट्या आश्र्वासनाशिवाय काही हाती आले नाही.म्हणून आम्ही वरील भूखंड संस्थेच्या वतीने खरेदी करून त्या ठिकाणी भव्य दिव्य स्मारकासह बौद्ध प्रशिक्षण केंद्र वाचनालय (ग्रंथालय) भंतेनिवास,स्पर्धा परीक्षेचे वर्ग व इतर बरेचसे उपक्रम राबविण्याचा आमच्या संस्थेचा मानस आहे. ही सर्व जागा २९ गुंठे अर्थात पाऊन एकर आहे. व त्याची किंमत कोटीच्या घरात आहे आणि ती विकत घेण्याचा आपल्या सर्वांच्या माध्यमातून आमचा प्रयत्न आहे.हा ऐतिहासिक लढा केवळ तळेगांव दाभाडे च्या रहिवाशा पुरता मर्यादित न ठेवता महाराष्ट्रातील सर्व आंबेडकरी विचारांच्या अनुयायांनी त्यात तन–मन,धन देऊन सहकार्य करावे.जबाबदारी घ्यावी यासाठी अशा बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे. आपणास विनंती तसेच आवाहन करते ते की याकरीता आपल्या सहकाऱ्याची आवश्यकता आहे.असे ॲड.रंजना भोसले अध्यक्ष यांनी सांगितले.

या बैठकीला सागर रामभाऊ तायडे पत्रकार साहित्यिक कामगार नेते,विनोद शामरावजी वावरे,दादासाहेब यादव,दिलीप शिवराम जाधव,अमोल जगधने,माधुरी सपकाळे,शशिकांत सावंत,ॲड.उदय रसाळ,शालिनी औचार,वसंत सपकाळे,परमानंद मेश्राम,राजीव साळवी,अविनाश जाधव,उदय रसाळ माजी नगरसेवक,भागवत बिराडे यांनी या कार्यक्रमास सहभाग घेतला.किसन थुल सचिव यांनी प्रास्ताविक केले,तर सुरेश श्रीपत जाधव यांनी सूत्रसंचालन केले,दादासाहेब यादव यांनी आभार मानले.विश्र्वस्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर समिती संचालक तळेगाव दाभाडे,दादासाहेब यादव,सुरेश श्रीपत जाधव,अँड.सुरज वासनिक यांची मुंबई समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**सागर तायडे यांस कडून**

# मातुळ येथील शेतकऱ्याच्या आरवाड्यावरील चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी मोकाट ; आरोपींकडून फिर्यादीच्या जीवितास धोका

## चोरीच्या गुन्ह्यातून पळ काढण्यासाठी महिला आरोपीचे उपोषण

भोकर/प्रतिनीधी/तालुक्यातील मातुळ येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील उभ्या पिकावर ट्रॅक्टर चालवून पत्राच्या शेडची नासधूस करून त्यामधील ठेवलेल्या खतांच्या पोत्यांची व औषधांची चोरी केल्याने चार जनाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एवढा गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करून आठ दिवस लोटून गेले असतानाही चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी मात्र मोकाट फिरत आहेत .चोरीच्या गुन्ह्यातून व अटकेपासून पळ काढण्यासाठी पोलिसांवर दबाव आणत महीला आरोपीचे नांदेड येथे उपोषण सुरू आहे.

सविस्तर वृत्त असे की, दिनांक १८ जुलै २०२५ रोजीच्या मध्यरात्री भोकर तालुक्यातील मौजे मातुळ शिवारातील गट क्रमांक २४४ मधील शेत जमीन मालक आनंदा म्हैसाजी फुले या शेतकऱ्यांच्या शेतात जबरदस्ती घुसून डोलू लागलेल्या उभ्या ज्वारी पिकावर ट्रॅक्टर चालून पीक भुईसपाट केले. शेतात उभा केलेल्या पत्री शेड पाडून त्यामध्ये ठेवलेल्या खतांचे पोते व औषधांचे बाटल्या चोरून नेले. चोरीची पूर्ण घटना शेत शेजारील एका शेतकऱ्याने बघून सांगितल्याने शेत जमीन मालकांनी दिलेल्या फिर्यादीवरून मातुळ येथील रामा विठ्ठल फुले, शिवराम गंगाधर करेवाड,वर्षा रामा फुले व लोक स्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षा संगीता मोहन पवळे यांच्या विरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एवढा गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करून आठ दिवस लुटून गेले असतानाही पोलिसांकडून त्यांना ताब्यात घेतले जात नाही. सदरील घटनेतील आरोपी मोकाट फिरत असुन फिर्यादी व साक्षीदारांना जिवे मारण्याच्या धमक्या देत आहेत.

यातील महिला आरोपी लोकस्वराज्य आंदोलनाच्या जिल्हाध्यक्षा संगीता मोहन पवळे या चोरीच्या गुन्ह्यातून व अटकेपासून पळ काढण्यासाठी आपल्या संघटनेचा व पदाचा गैरवापर करून चक्क जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर आमरण उपोषण करत आहेत व फिर्यादीने दिलेल्या अर्जावरून पोलीस उपनिरीक्षक सुरेश जाधव व काही पोलीस कर्मचारी शेतामध्ये चौकशीला गेले असता ते शेतात का आले म्हणून त्यांचे निलंबन करण्यात यावे ही मागणी करून त्यांच्यावर दाखल केलेला चोरीचा गुन्हा मागे घेऊन फिर्यादीवरच गुन्हा दाखल करा म्हणून पोलिसांवर दबाव आणण्यासाठी उपोषणाद्वारे मागणी करीत आहेत.

फिर्यादी शेतमालक यांनी दिनांक १९ जुलै रोजी भोकर पोलिसात दिलेल्या तक्रारी अर्जात वरील चार आरोपींसह सदरील चोरीमधे अविनाश रामा फुले, आदर्श रामा फुले, भिमाबाई रामा फुले, किशन शिवराम करेवाड वरील राहणार मातुळ ता. भोकर जि. नांदेड व प्रसाद मैसन्ना बुलोल्ला,अशोक मैसन्ना बुलोल्ला,अनिता प्रसाद बुलोल्ला रा. पूस्पुर मंडळ लोकेश्र्वरम जि. निर्मल व भीमराव मरीबा लोखंडे रा.तुराटी ता. उमरी जि. नांदेड व ईतर काहीजण माझ्या शेतात घुसून उभ्या पिकाची नासधूस करून चोरी केल्याचे नमूद केले असतानाही भोकर पोलीस मात्र फिर्यादी व प्रत्यक्ष साक्षीदारावर दबाव टाकून केवळ चार आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केला. अर्जातील ईतर लोकांची पाठराखण करण्याचे काम पोलीसांनी केले.

चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी जिवे मारण्याची धमकी देत असल्याची व त्यांच्याकडून माझ्या जीवितास धोका असल्याचे फिर्यादीने व साक्षीदाराकडून भिती व्यक्त केली जात आहे करिता आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी व अर्जातील इतर लोकांचे नाव गुन्ह्यात समाविष्ट करावे अशी मागणी फिर्यादी कडून होत आहे.

# राशीभविष्य २९ जुलै २०२५

मेष: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
व्यवसायात यश मिळेल. अडकलेला पैसा मिळेल. अधिक विश्वास दाखवून कामे करू नका. भाग्याचे पूर्ण सहकार्य आज लाभणार आहे.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
दूरदर्शिपणामुळे व चातुर्यामुळे अनेक अडचणीं पार पाडताल. कामातील गती कायम राखल्याने यश मिळेल. समाजातील प्रतिष्ठेत वाढ होईल. नवीन संबंध फायदेशीर राहतील.

मिथुन : शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण
नवीन योजना फायदेशीर राहतील. मानसिक तणावापासून मुक्ति मिळेल. आळस सोडून द्या. स्थावर मालमत्तेचे काम पूर्ण होईल. संयम बाळगा.

कर्क :शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर
मुलांच्या प्रगतीचे योग आहेत. कामात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. शुभ संकेत मिळाल्याने आपले मन उत्साहित राहील. आर्थिक लाभ भरपूर होईल. परमेश्वरावरील विश्वासात वाढ होईल.

सिंह : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:पश्चिम
आपल्या कामाची लोक स्तुती करतील. विचारपूर्वक काम केल्यामुळे कामकाजाची स्थिती भक्कम होईल. अहारावर नियंत्रण असू द्या. सार्वजनिक कामात यश मिळेल.

कन्या :शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर
योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबध दृढ होतील. व्यापारा स्पष्टपणा राखा. व्यापार नौकरीत इच्छेप्रमाणे उन्नती होईल. वाचनाची गोडी वाढणार आहे.

तुळ: शुभ रंग :पांढरा, शुभ दिशा: उत्तर
आर्थिक तंगी वाढल्याने व कौटुंबिक अडचणीमुळे मानसिक स्थिती चांगली राहणार नाही. आपल्या योग्यतेचे मूल्यमापन होणार नाही. व्यक्तिगत समस्या निर्माण होईल.

वृश्चिक: शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम
नशिबावर सोडून दिलेले कामे पार पडतील. आर्थिक फायदा होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

धनु: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
प्रसन्न वातावरण असल्यामुळे आपण केलेले प्रयत्न यशस्वी राहतील. चोरी किंवा नुकसान होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक वातावरण आनंदमय राहील. व्यापारात घेतलेले निर्णय फायदेशीर असणार आहेत.

मकर :शुभ रंग: पांढरा : शुभ दिशा: पश्चिम
आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा. सरकारी कामे पार पडतील. कुटुंबात शुभ कार्याची चर्चा होऊन रूपरेषा आखली जाईल.

कुंभ: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
रोजगारामध्ये बदल किवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल. जीवनसाथीच्या भावनेकडे दुर्लक्ष करू नका.

मीन :शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण
निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांशी वाद होण्याचा संभव आहे. हाती कमी पैसा असल्याने आपले काम अपूर्ण राहण्याची शक्यता आहे.

# उपदेशकथा
## यशाला ‘शॉर्टकट’ नाही

आयुष्यात आपल्याला पुढे जायचे असेल, यशस्वी व्हावयाचे असेल तर भरपूर काबाडकष्ट, परिश्रम करण्याची तयारी हवी. यश तसे मिळत नाही. प्रतिभा म्हणजे दुसरं काही नाही. ‘नव्याण्णव टक्के घाम नि एक टक्का राम ।‘ असे म्हणतात. (जिनीयस इज नाइन्टीनाइन परसेंट... पार्स्पिरेशन अॅन्ड वन परसेंट इान्स्पिरेशन) लेखनाची ढोरम`हनत, काबाडकष्ट यांना सीमा नसते. टॉलस्टॉयने

‘वॉर अॅन्ड पीस’सारखी जंगी कादंबरी सात वेळा नव्याने लिहिली आणि त्याच्या पत्नीने न कंटाळता सात वेळा तिची ‘फेअर कॉफी’ केली! रचना लिहून पुरी झाली की, लेखकाला उमजते – हे असे नाही, असे लिहिले जायला हवे होते. ‘रन्वाँ’ या प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शकाने म्हटले होते, ‘एखादी फिल्म मी पुरी करतो तेव्हा मला कळते ती कशी करायला हवी होती. (व्हेन यू फिनिश मेकिंग ए फिल्म, यू नो देन हाऊ यू शूड हॅव मेड इट)

कथा उपदेश : परिश्रमाला पर्याय नाही.

## (गुरु वचन)
## भगवद्गीतेत जीवनाचा प्रवाह – स्वामी देवेंद्रानंदगिरी

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दु:खाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो. गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे.

साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894